दैनिक संध्या

# इनसाइडर न्यूज टुडे

गुपीत उघड करणारी नजर, बातमी तुमची, जबाबदारी आमची

RNI. No : MHMUL/25/A0574


वर्ष : १ ■ अंक १४ ■ पृष्ठ ४ ■ मुल्य ५ रू

www.insidernewstoday.in | facebook.com/newstoday24x7offical | नागपूर, सोमवार ७ जुलै २०२५ | insidernewstoday@gmail.com | @insidernewstoday

## बिल्डर-प्रशासनाच्या संगनमताने बेसमेंटच्या नावाखाली नागपूरात

# अवैध उत्खननाचा उघडपणे खेळ!

### नागपूरात बेसमेंटच्या नावाखाली मोठ्या इमारती व हॉस्पिटल्समध्ये उघडपणे अवैध उत्खनन!



**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** नागपूरात बिल्डर आणि प्रशासनाच्या संगनमताने बेसमेंटच्या नावाखाली अवैध उत्खननाचा उघडपणे खेळ सुरू आहे! महसूलमंत्री बावनकुळे यांच्या पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यातच अनेक मोठ्या इमारती आणि निर्माणाधीन हॉस्पिटल्समध्ये बेसमेंट खोदकामाच्या आडून मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

शहरात झपाट्याने सुरू असलेल्या विकासकामांच्या आडून मोठ्या प्रमाणावर महसूल हानी घडवणारा अवैध उत्खनन घोटाळा समोर येत आहे. बेसमेंट खोदकामाच्या नावाखाली परवा नगीपेक्षा चार ते पाच पट माती काढून ती काळ्याबाजारात विकली जात असून, बिल्डर आणि महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गोरखधंदा फोफावला आहे. या प्रकरणात काही राजकीय हस्तक्षेपाचाही संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### ■ महसूल वाढीचा नारा की अवैध उत्खननमुक्ती फक्त गोष्टीपुरती?

एका बाजूला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे नवीन-नवीन धोरणं तयार करून राज्याच्या महसुलात वाढ करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याच पालकमंत्री असलेल्या नागपूर जिल्ह्यात बेसमेंटच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन सुरू आहे. महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी महसूलमंत्र्यांच्या आदेशांना डावलून कार्यवाहीस टाळाटाळ करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

नागपूर शहरात सुरू असलेल्या मोठमोठ्या इमारतींच्या आणि निर्माणाधीन हॉस्पिटल्सच्या बेसमेंट खोदकामात तहसील कार्यालयाकडून केवळ ५०० ते १००० ब्रास माती काढण्याची परवानगी घेतली जाते. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून यापेक्षा पाच ते सहापट अधिक अवैध उत्खनन केले जाते. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे आणि संगनमतातून नागपूरमध्ये अवैध उत्खननाचा धुमाकूळ सुरू आहे."

**नाममात्र परवानगी, पण उत्खनन अनेक पटीने अधिक!**

■ बिल्डर्सना बेसमेंट उत्खननासाठी १00 ते १५00 ब्रास माती काढण्याची परवानगी देण्यात येते. मात्र प्रत्यक्षात, ४ ते ५ पट अधिक खुदाई केली जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

■ लाखो टन माती बेकायदेशीरपणे विक्रीस काढली जाते, ज्यामुळे सरकारच्या तिजोरीला कोट्यवधी रुपयांचा फटका बसत आहे.

### ■ नागपूरमध्ये अनेक इमारती संशयाच्या भोवऱ्यात

सूत्रांच्या माहितीनुसार, आज जर नागपूरमध्ये योग्य चौकशी करण्यात आली, तर "अनेक मोठ्या इमारतींमध्ये तसेच निर्माणाधीन मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये बेसमेंट खोदकामाच्या नावाखाली अवैध उत्खनन सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे." खोदकामाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात माती काढून विक्री करण्यात आली असल्याचे धक्कादायक प्रकार उघड होऊ शकतात. या सर्व प्रकरणांमध्ये नाममात्र परवानगी दाखवून हजारो ब्रास माती बेकायदेशीरपणे काढली गेल्याचे संकेत मिळाले आहेत.

### चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाईची मागणी



या प्रकरणामुळे नागपूरकरांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. नागरिकांची मागणी आहे की, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी. संबंधित अधिकाऱ्यांवर आणि प्लॉटधारकांवर फौजदारी स्वरूपात गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशीही जोरदार मागणी आहे.या गोरखधंद्यात महसूल विभाग आणि महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची थेट जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही गुन्हेगारी कारवाई करण्यात यावी, अशी नागपूरकरांची ठाम मागणी आहे. केवळ बिल्डरच नव्हे तर हे प्रकार मूकसंमतीने चालू देणाऱ्या अधिकारी वर्गालाही जबाबदार धरले पाहिजे.

### ■ महापालिका अधिकाऱ्यांचा आशीर्वाद?

या साऱ्या प्रकरणाला प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचा सक्रिय पाठिंबा असल्याचे सांगण्यात येत आहे. महसूल आणि महापालिका विभागातील संबंधित अधिकारी हा प्रकार जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. इच्छाशक्ती असेल, तर ही चेन तत्काळ थांबवता येऊ शकते, परंतु भ्रष्टाचारामुळे कारवाई लांबणीवर टाकली जात असल्याची जोरदार चर्चा आहे.

### ■ कोट्यवधींचा चुना; दंडाद्वारे वसुलीची संधी

या अवैध उत्खननावर निष्पक्ष आणि सखोल चौकशी झाली, तर हजारो ट्रक माती बेकायदेशीरपणे काढल्याचे स्पष्ट होईल. शासनाच्या नियमानुसार, परवानगीपेक्षा अधिक माती उत्खनन केल्यास बिल्डरवर मोठा दंड आकारता येतो. जर प्रशासनाने कडक भूमिका घेतली, तर ही रक्कम नागपूरच्या विकासकामांसाठी मोठी मदत ठरू शकते.

### सत्तेच्या सावलीत न्यायाच्या शोधात...

## मुंबई विधानभवनाबाहेर प्रिया फुके यांचे आंदोलन!



**मुंबई, प्रतिनिधी ता. ७ :** राज्याच्या राजधानी मुंबईत सोमवारी सकाळी एक धक्कादायक प्रसंग समोर आला, जेव्हा नागपूरच्या प्रिया फुके या आपल्या दोन लहान मुलांसह थेट मुंबईतील विधानभवनाबाहेर ठिय्या आंदोलनाला बसल्या. त्यांनी आपल्यावर झालेल्या अन्यायाची कहाणी प्रसारमाध्यमांसमोर मांडत न्यायासाठी गेल्या काही महिन्यांपासून सुरु असलेल्या संघर्षाची हकीकत उघड केली.

विशेष म्हणजे, भारतीय जनता पार्टीचे विधान परिषद सदस्य परिणय फुके यांच्या घरातील वाद आता थेट चव्हाट्यावर आला आहे. काही दिवसांपूर्वी प्रिया फुके यांनी पत्रकार परिषद घेत आमदार परिणय फुके आणि त्यांच्या कुटुंबियांवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर आता त्यांनी विधानभवनासमोर आंदोलन छेडत पुन्हा एकदा आमदार परिणय फुके यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांविरोधात गंभीर आरोप करत न्यायाची मागणी केली आहे. आंदोलन सुरू असतानाच मुंबई पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. प्रिया फुके यांनी स्पष्टपणे सांगितले की, त्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्याचा गेल्या वर्षभरापासून प्रयत्न करत आहेत. "मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत प्रत्यक्ष भेट घ्यायची आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले. महिला आयोग, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेतृत्व यांच्याकडे वारंवार निवेदने देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने त्या आता कायदेशीर लढाईच्या मार्गावर आहेत. "माझ्यावर अन्याय झाला आहे, माझं आयुष्य उद्ध्वस्त झालं आहे, आता मी गप्प बसणार नाही," असा थेट इशारा त्यांनी दिला. त्यांच्या या आक्रमक आंदोलनामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून, विरोधकांनी यावरून सरकारला घेरण्याची तयारी सुरु केली आहे. भाजपकडून अद्याप यावर कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही. अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न असल्याचेही स्पष्ट केले. न्यायव्यवस्था, प्रशासन आणि राजकीय यंत्रणा या सर्वांकडून वारंवार दुर्लक्षित केल्याचा अनुभव त्यांनी शेवटी माध्यमांसमोर मांडला, आणि महिलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे.

## डॉ. नरेंद्र पहाडे यांची भाजपमध्ये 'घरवापसी'



**भंडारा, प्रतिनिधी ता. ७ :** भंडाऱ्यातील राजकारणात चर्चेचा विषय ठरत, ज्येष्ठ नेते डॉ. नरेंद्र पहाडे यांनी पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षात (भाजप) 'घरवापसी' केली आहे. काही काळ ठाकरे गटाच्या शिवसेनेशी जोडले गेलेले डॉ. पहाडे यांनी अखेर कमळाशी नाळ पुन्हा जुळवत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. डॉ. पहाडे हे भाजपचे जुने, निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. मात्र 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भंडारा मतदारसंघातून त्यांना उमेदवारी नाकारण्यात आल्याने त्यांनी पक्षापासून नाराजी व्यक्त करत स्वतःहून दूर जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर काही काळ त्यांनी ठाकरे गटात सक्रियता दर्शवली; पण अपेक्षित राजकीय संधी व स्थान न मिळाल्याने त्यांनी पुन्हा मूळ पक्षात परतण्याचा निर्णय घेतला.

या 'घरवापसी'मागे अनेक राजकीय गणिते असून अनेक विश्लेषक आणि कार्यकर्ते याला एक नियोजित रणनीती मानत आहेत. काहींचे म्हणणे आहे की, "डॉ. पहाडे यांनी भाजप सोडले तरी त्यांचे मन तिथेच होते. ही केवळ राजकीय 'घटस्फोटानंतरची तात्पुरती फटकेबाजी' होती, प्रेम संपले नव्हते!" त्यांच्या पुनःप्रवेशामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपची स्थानिक पातळीवरील जातीय आणि सामाजिक समीकरणे अधिक बळकट होतील, असा दावा केला जात आहे.या पक्षप्रवेशाचा सोहळा फारच भव्य आणि लक्षवेधी ठरला. आमदार परिणय फुके, भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. त्यामुळे डॉ. पहाडे यांची घरवापसी ही केवळ एक साधा प्रवेश नसून भाजपच्या आगामी राजकीय योजना आणि उमेदवारीच्या संभाव्य समीकरणांचा भाग असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि संघटन कौशल्याचा भाजपला भविष्यात नक्कीच लाभ होईल, असे अनेकांचे मत आहे.

## प्रियकराच्या मदतीने पतीची केली हत्या

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** झोपेत असताना उशीने पतीचे नाक, तोंड दाबले. त्याचा गळाही आवळला. काही वेळ तो तडफडला. मात्र, श्वास थांबताच तो शांत झाला. त्याला पक्षाघात असल्याने तसाही तो प्रतिकार करण्यास असमर्थ होता. चंद्रसेन रामटेके (38) रा. साईनाथ सोसायटी (तरोडी खुर्द) असे मृतकाचे नाव आहे. प्रियकराच्या मदतीने तिने पतीची हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नी आणि तिच्या प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल केला. दिशा चंद्रसेन रामटेके (30), आसिफ राजा (28) रा. राजनगर, वाठोडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. मृतक चंद्रसेन रामटेके (38) हा एका ट्रॅव्हल्स कंपनीत व्यवस्थापक म्हणून कामाला होता. महालगावची राहणारी दिशासोबत त्याचे 13 वर्षांपूर्वी लग्न झाले. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा आहे. मोठी मुलगी 11 वर्षांची आहे. त्याला दारूचे व्यसन होते. तरीदेखील त्यांचा संसार आनंदात सुरू होता. व्यसनामुळे त्याला अचानक दीड वर्षांपूर्वी पक्षाघात झाला. तेव्हापासून तो खाटेवरच होता. डिसेंबर 2024 मध्ये तिची ओळख राजासोबत झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. जानेवारी 2025 पासून त्यांचे प्रेम बहरत गेले. इकडे चंद्रसेन हा खाटेवरच असल्याने असमर्थ होता.

## ऊस उत्पादन वाढीसाठी एआय फायद्याचे

### ■ केंद्रीय मंत्री गडकरी यांना विश्वास, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे कार्यशाळा

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** जगातील सर्वोत्तम अद्ययावत ज्ञान आणि आपल्या जवळच्या माणसांनी केलेले यशस्वी प्रयोग समजून घेत शेतकऱ्यांना पुढे जावे लागणार आहे. शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर ऊस, सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी फायद्याचा ठरू शकतो, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी (रविवार, दि. ६ जुलै) व्यक्त केला.



ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. एनबीबीएस सभागृह, (राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग संस्थान) अमरावती रोड येथे झालेल्या या कार्यशाळेला ना. श्री. नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर बारामती कृषी विज्ञान केंद्रातील संशोधक डॉ. विवेक भोईटे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर, मार्गदर्शक डॉ. सी. डी. मायी, आनंदराव राऊत, रमेश मानकर, सुधीर दिवे, डॉ. समय बनसोड, भोजराम कापगते, अनिल जोशी, जयकुमार वर्मा, एनबीबीएसचे संचालक डॉ. नितीन पाटील, डॉ. कलंत्री आदी प्रामुख्याने उपस्थित होते. गडकरी म्हणाले, 'शेतकऱ्याचे उत्पादन थेट बाजारात जाणे. त्याच्या मालाला चांगला भाव मिळणे खूप आवश्यक आहे. त्यादृष्टीने काम सुरू आहे. शेतकऱ्यांना गोडाऊन, कोल्ड स्टोरेज उपलब्ध करून देण्याची गरज आहे.' विदर्भात विशेषतः सोयाबीन, कापूस, संत्रा, ऊस या पिकांवर फोकस ठेवावा लागेल. योग्य तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि संशोधन मिळाले तर विदर्भातील शेतकरी नक्कीच प्रगती करू शकेल. त्यासाठी नवे तंत्रज्ञान आणि संशोधन शेतकऱ्यांना समजून घ्यावे लागेल. एकमेकांच्या समन्वयातूनच हे शक्य आहे. त्यासाठी नॉलेज ट्रान्सफॉर्मेशन चेन निर्माण करावी लागेल,' असेही गडकरी म्हणाले. यावेळी गडकरी यांनी बांबु लागवडीचे महत्त्व देखील सांगितले. सूत्रसंचालन नितीन कुलकर्णी यांनी केले.

### ■ शेतकऱ्यांना होईल फायदा

शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग आणि फायदे यांची सखोल माहिती बारामती कृषी विज्ञान केंद्रातील संशोधक डॉ विवेक भोईटे यांनी दिली. उत्पादकता व उत्पन्न वाढीसाठी हे आय-आय तंत्रज्ञानाचा वापर विदर्भातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरू शकतो असे डॉ. भोईटे यावेळी म्हणाले. ॲग्रो व्हिजन च्या माध्यमातून लवकरच विदर्भातील प्रगतिशील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ बारामती कृषी विज्ञान केंद्राला भेट देणार असून तेथील तंत्रज्ञान अवगत करून घेणार आहे.

### ऑरेंज सिटी पार्क योजनेचे बांधकाम थांबवले; स्ट्रॅप: PMAY गैरव्यवहाराची चौकशी सुरू

# ठाकरे यांच्या तक्रारीनंतर म्हाडाचा मोठा निर्णय

**गडचिरोली, प्रतिनिधी ता. ७ :** पंतप्रधान आवास योजनेत (PMAY) मंजूर झालेल्या ऑरेंज सिटी पार्क गृहनिर्माण योजनेत गंभीर गैरप्रकार, फसवणूक आणि नियमभंग उघड झाल्यानंतर मुंबईतील म्हाडा, PMAY प्राधिकरणाने, वानाडोंगरी (ता. हिंगणा) येथे सुरू असलेले या योजनेचे बांधकाम तत्काळ थांबवण्याचे आदेश दिले आहेत. पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी हा घोटाळा उघडकीस आणल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

म्हाडाच्या पंतप्रधान आवास योजना प्राधिकरण, मुंबई यांनी १ जुलै २०२५ रोजी योजनेचे वास्तुविशारद आलोक लुनिया यांना पत्र पाठवून बांधकाम थांबवण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. यापूर्वी १० जून २०२५ रोजी गृहनिर्माण राज्यमंत्री आणि वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली ठाकरे यांच्या तक्रारीवर बैठक झाली होती. त्यांनी चौकशी समितीचा अहवाल येईपर्यंत बांधकाम थांबवण्याचे निर्देश दिले.

या प्रकरणात, २ जून २०२५ रोजी आमदार ठाकरे यांनी नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अधिकृत तक्रार दिली होती. त्यानंतर बावनकुळे यांनी डॉ. भोयर यांना यासंदर्भात तातडीने बैठक घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले. PMAY अंतर्गत मंजूर झालेल्या या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य प्रकार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. नागपूरस्थित मिलेनियम डेव्हलपर्स अँड प्रमोटर्स प्रा. लि. या कंपनीने वानाडोंगरी (खसरा क्र. ३८० आणि ३८१) येथील जमिनीवर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मल्टी-स्टोरी फ्लॅट्स आणि व्हिला बांधण्याचे काम सुरू केले आहे. परंतु या संपूर्ण योजनेत नियमांचे उल्लंघन, प्रकल्पाच्या मंजुरीत फसवणूक व नागरिकांची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर म्हाडाने तातडीने हस्तक्षेप करत बांधकाम थांबवण्याचे आदेश दिले असून, चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.

### ■ आमदार ठाकरे यांचा मागणी



मुंबई आणि नागपूर येथील म्हाडा अधिकाऱ्यांनी फसवणुकीच्या क्लृप्त्या आणि गंभीर नियमभंग करत लेआउट व इमारत नकाशांना मंजुरी दिली, तसेच बिल्डरला पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अनुदानाचा लाभ मिळवून दिला. नागरिकांनी आपल्या आयुष्यभराच्या बचतीतून या योजनेतील व्हिला आणि फ्लॅट्स खरेदी केले आहेत. गृहनिर्माण विभागाने संपूर्ण योजनेचा तातडीने ताबा घ्यावा आणि संबंधित म्हाडा अधिकाऱ्यांसह बिल्डरविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवावा मागणी आमदार विकास ठाकरे यांनी तक्रार द्वारे केली आहे.

### ■ बनावट रस्त्यावर मंजुरी मिळवली:

लेआउट मंजुरीसाठी मुख्य रस्ता असणे बंधनकारक असताना, बिल्डरने बनावटपणे असा रस्ता दाखवला, जो प्रत्यक्षात अस्तित्वातच नाही. आश्चर्य म्हणजे, ज्या जागेवर १८ मीटर रुंद रस्ता दर्शवण्यात आला आहे, ती जमीन मंजुरीच्या दिवशी आणि आजतागायतही बिल्डरच्या मालकीची नाही.

### ■ चुकीच्या विकास आराखड्याचा आधार:

वानाडोंगरी २०१६ पासून नगरपरिषद आहे आणि त्या भागावर प्रादेशिक योजना (Regional Plan) लागू आहे. मात्र, म्हाडाने या लेआउटच्या मंजुरीसाठी नागपूर महानगर प्राधिकरणाचा (NMRDA) विकास आराखडा (Development Plan) विचारात घेतला. धक्कादायक बाब म्हणजे, प्रादेशिक योजनेत सदर लेआउटपर्यंत कोणताही रस्ता प्रस्तावित नाही.

### ■ रस्ता नसतानाही प्लिंथ सर्टिफिकेट जारी:

वानाडोंगरी नगरपरिषदेची मंजुरी न घेता व प्रत्यक्ष रस्ता तयार नसताना, म्हाडाने बांधकामाला प्लिंथ सर्टिफिकेट दिली.फायर NOC नसतानाही अनेक ८ मजली इमारतींच्या नकाशांना बिनधास्त मंजुरी देण्यात आली.

### ■ सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा स्पष्ट उल्लंघन:

ऑक्युपन्सी सर्टिफिकेट, स्ट्रक्चरल Stability Certificate व फायर NOC न घेता काही व्हिलांचे ताबे ग्राहकांना देण्यात आले. काही नागरिक तिथे वास्तव्यासही आहेत. ही बाब दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या थेट विरोधात जाते (सिव्हिल अपील क्र. १४६०४/२०२४).

### ■ पर्यावरण व नागरी नियमांचा संपूर्ण बडगा उडवला:

सीवेज डिस्पोजल यंत्रणा, मालमत्ता कर मूल्यांकन, तसेच वानाडोंगरी नगरपरिषदेची आवश्यक परवानगी न घेता संपूर्ण योजना उभारली. सांडपाणी शेजारील शेतीमध्ये सोडले जात आहे.


### ■ शेतजमीन बळकावल्याचे आरोप:

शेजारील शेती भूधारकांनी तक्रारी करत म्हटले की, बिल्डरने त्यांच्या जमिनीवर बेकायदेशीर ताबा घेतला आहे. याबाबत नगरपरिषद, पोलिसांकडे लेखी तक्रारी देण्यात आल्या आहेत.

इनसाइडर न्यूज टुडे



# खापरखेड्यात 23 जोडप्यांचा सामूहिक विवाह बौद्ध पद्धतीने पार पडला



**खापरखेडा, प्रतिनिधी ता. ७:** संत गाडगेबाबा बहुउद्देशीय शिक्षण संस्था व सामाजिक न्याय विभागाच्या संयुक्त विद्यमाने व बसपाच्या पुढाकाराने खापरखेडा येथील साहिल सभागृहात 23 जोडप्यांचा बौद्ध पद्धतीने सामूहिक विवाह सोहळा पार पडला. या विवाहाचे वैशिष्ट्य असे की यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ईतर मागासवर्गीय व धार्मिक अल्पसंख्यांक अशा बहुजन समाजातील विविध जाती व विविध धर्माच्या वर-वधुनी बौद्ध पद्धतीने विवाहाला अनुमती दिली. त्यामुळे धम्ममित्र जगदीश शेंडे यांनी बौद्ध पद्धतीने हा सामूहिक विवाह पार पाडला.

या ऐतिहासिक विवाह सोहळ्याला प्रामुख्याने बहुजन समाज पार्टीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडियाचे प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, जिल्हाध्यक्ष लांजेवार, जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, जिल्हा कोषाध्यक्ष उमेश मेश्राम पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यांच्या हस्ते विवाह नोंदणी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

**यांचा विवाह पार पडला :** अनिकेत हेमराज जामगडे व पूजा पृथ्वीराज शेंडे, दीपक बारसुजी भोयर व शितल खुशाल घरडे, देविदास सिताराम रडके व पिंकीबाई खेलसिंग सतनामी, रोहित सुनील सालवणकर व पुनम राजकुमार रंगारी, रितेश शेखर मेनन व प्रीती उज्वल बोरकर, सुरज कैलास खोब्रागडे व समीक्षा शरद ढोके, पंकज नागोराव राऊत व काजल संदेश जारोंडे, हेमराज माधवराव लडके व अनुराधा मनसु टेकाम, आकाश राहुल लांडगे व जुही राजेंद्र बागडे, मुकुल सुदराज बारमाटे व अंजली मधु भोसले, उमेशकुमार विजयपाल वर्मा व अंजू देशराज वर्मा, शाहिद सत्तार शेख व प्रिया गणेश सरोदे, सोमेश उज्वल बोरकर व आरती ज्ञानेश्वर गायकवाड, अमरदीप वासुदेव गजभिये व दर्शना दशरथ वासनिक, अमित चिंतामण डोईजड व काजल सुंदरलाल चंदनबरवे, समर्थन फिरोज चिंचखेडे व आचल नंदकिशोर नानवटकर, सुमित धनीलाल मेश्राम व आरती दशरथ घरडे, बबन रामा पाटील व रिया यादोवराव बावणे, स्वप्निल सूर्यभान हाडके व हेमा सुनील कुंभारे, संदेश रामभाऊ कुर्वे व नंदिनी ज्ञानदेव भगत, प्रज्वल कमलेश जनबंधू व पायल छोटू कोल्हेटकर, मयूर राजू भिवगडे व लक्ष्मी श्रीराम पोहनकर, हर्षल दिलीप इंदोरकर व हर्षा हरीश ऊके ह्या बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम, आदिवासी व हिंदू धर्मातील वर वधूंचा समावेश होता. कार्यक्रमाचे आयोजक विजय कुमार डहाट, तसेच बसपा सावनेर विधानसभे च्या ताराबाई गौरखेडे, चंद्रगुप्त रंगारी, सुनील बारमाटे, रंजना घरडे, रामभाऊ कुर्वे, साधना काटकर, बबन वासनिक सुधाकर खांडेकर अरविंद ढोरे उत्तम गजभिये विजय ढोणे व त्यांच्या अनेक सहकार्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली होती. कार्यक्रम भव्य असला तरी सामाजिक न्याय विभागाची उदासीनता मात्र दिसून आली. उपस्थित असलेल्या 23 जोडप्या सहित त्यांच्यासोबत आलेल्या सर्व आप्त मित्रांनी सहभोजनाचा आनंद घेतला.

## केडीएस ज्युनिअर कॉलेजच्या आषाढी एकादशीचा उत्सव साजरा



**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** पवित्र आषाढी एकादशी निमित्त कै. कमलताई दवंडे व जूनियर कॉलेज येथे भक्तीभाव, पारंपरिकतेने आणि संस्कारांनी परिपूर्ण कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. शाळेतील विद्यार्थ्यांनी वारी (दिंडी) मधून सहभागी होत, वारकरी वेशभूषेत "विठ्ठल विठ्ठल"चा जयघोष करत परिसरात भक्ती व एकतेचा संदेश दिला. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व श्री विठोबा यांच्या जीवनावर आधारित कथाकथन सत्र घेण्यात आले, ज्यातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये आणि सदाचरण यांचे शिक्षण मिळाले. कार्यक्रमाचा विशेष क्षण म्हणजे विद्यार्थ्यांद्वारे आत्मविश्वासाने सादर केलेला भगवद्गीतेतील श्लोक -"न मे भक्तः प्रणश्यति", जो भक्तीचे महत्व अधोरेखित करतो. शाळेच्या "संस्कार सेतु" यावार्षिक संकल्पने अंतर्गत कै. कमलताई दवंडे व जूनियर कॉलेजविद्यार्थ्यांचे शैक्षणिक विकासा बरोबरच चारित्र्य व संस्कारांचे शिक्षण देण्यावर भर देत आहे.

## अग्रलेख

### सुधारणा की कारस्थान?

**बिहारमध्ये येत्या काही महिन्यांत विधानसभेची निवडणूक होऊ घातली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने तेथील मतदारयाद्या अद्ययावत करण्यासाठी व्यापक मोहीम सुरू केली असून, त्यावरून राजकीय घमासान सुरू झाले आहे.**



महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील मतदारयादीबाबत सुरू असलेल्या आरोपांची धूळ खाली बसलेली नसताना बिहारच्या निमित्ताने निवडणूक आयोग पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. बिहारमध्ये येत्या काही महिन्यांत विधानसभेची निवडणूक होऊ घातली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने तेथील मतदारयाद्या अद्ययावत करण्यासाठी व्यापक मोहीम सुरू केली असून, त्यावरून राजकीय घमासान सुरू झाले आहे.

निवडणुकीच्या तोंडावर ही मोहीम हाती घेण्यामागे राजकीय कावा असल्याचा आरोप विरोधी पक्ष करीत आहेत. या निमित्ताने निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून गरीब, दलित आणि अल्पसंख्याक मतदारांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव असल्याची टीका करतानाच हे सारे 'व्होटबंदी'चे कारस्थान असल्याचा आरोपही ते करीत आहेत. आयोगाच्या या मोहिमेच्या विरोधात 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स'यांसारख्या संस्थांनी न्यायालयात जाण्याची तयारी सुरू केली आहे. निवडणुकीच्या आधी मतदारयादी अचूक, निर्दोष आणि अद्ययावत असावी, हे खरे. मात्र, त्याच उद्देशाने आयोगाने हाती घेतलेल्या मोहिमेच्या विरोधात रण पेटण्यामागे बिहारमधील राजकीय, सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे. ती ओळखून आपल्यावर होत असलेल्या आरोपांचे आयोगाने तातडीने निराकरण करायला हवे.

वाढते शहरीकरण, स्थलांतर यांमुळे झालेल्या नव्या मतदारांची नोंदणी करतानाच आणि मृत मतदारांसह बेकायदा वास्तव्य करणाऱ्यांना मतदारयादीतून वगळणे, हे या मोहिमेमागील आपले उद्दिष्ट असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. या मोहिमेअंतर्गत नागरिकांना गणना अर्ज भरून देणे आवश्यक आहे. २६ जुलैपर्यंत बूथस्तरीय अधिकारी (बीएओ) घरोघरी जाऊन मतदारांची खातरजमा करणार आहेत. तसेच सन २००३नंतर नोंदणी झालेल्या मतदारांना आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्र अशा ओळखीच्या पुराव्यांसह जन्माचे प्रमाणपत्रही सादर करावे लागणार आहे. त्यातील अनेक अडचणींकडे विरोधक अंगुलिनिर्देश करीत मोहीम लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप करीत आहेत. यापूर्वी २००३मध्ये अशी मोहीम हाती घेण्यात आली, ती पूर्ण होण्यास दीड वर्षे लागली होती. त्या पार्श्वभूमीवर यंदा केवळ दीड ते दोन महिन्यांत ही प्रक्रिया कशी पूर्ण होणार, असा विरोधकांचा सवाल आहे.

रोजगारासारख्या वेगवेगळ्या निमित्ताने बिहारमधून होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण तब्बल २१ टक्के आहे. हे बहुतांश श्रमिक आहेत. त्यांपैकी अनेक जण मतदानासाठीच आपापल्या गावी येतात. हजारो कुटुंबे मखाणाफोड व अन्य श्रमांच्या कामांसाठी अन्यत्र जातात. या सर्वांची खातरजमा कशी करणार, हा मोठा प्रश्न आहे. दुसरीकडे नव्या अपत्याच्या जन्माची नोंदणी असण्याचे प्रमाण बिहारमध्ये फक्त ७२ टक्के आहे. उर्वरित २८ टक्के मतदारांना जन्मनोंदणी प्रमाणपत्र सादर करता येणार नाही. त्यामुळे हा नियमही वादाच्या भोवऱ्यात आहे. राज्यात दर वर्षी हजारो पूरग्रस्तांची घरेदारे वाहून गेल्याने त्यांच्याकडे कागदपत्रे नाहीत.

त्याशिवाय गरीब, अशिक्षित, दलित, भूमिहीन आणि बेघर किंवा बँक खाती नसलेल्या मतदारांचे काय, असाही प्रश्न आहे. या प्रश्नांना निवडणूक आयोगाने उत्तर दिलेले नाही. जन्मनोंदणी प्रमाणपत्राच्या सक्तीचा प्रामुख्याने तरुण वर्गाला फटका बसणार आहे. बेरोजगारीसारख्या प्रश्नांनी असंतोष असलेल्या या वर्गाला मतदानापासून वंचित ठेवण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव असल्याचा त्यांचा आरोप आहे. या निमित्ताने मागच्या दाराने नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) लागू करण्याचा प्रयत्न असल्याचीही टीका होत आहे.

विरोधात जाण्याची शक्यता असलेल्या मतदारांच्या नावांना कात्री लावून बिहारमधील मोठ्या लोकसंख्येचे 'राजकीय नागरिकत्व' धोक्यात आणण्याचे कारस्थान सरकार करीत असल्याच्या टीकेला ठोस उत्तर अद्याप दिले गेलेले नाही. या प्रकरणातून निवडणूक आयोगाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. साऱ्या देशाच्या मतदारयाद्यांमध्ये असंख्य चुका आढळतात, त्यामुळे अशी दुरुस्ती मोहीम देशभरात दर वर्षी घेतली पाहिजे; पण तसे वेगाने होताना दिसत नाही. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर बिहारमध्ये आयोगाकडून दाखवलेली ही तत्परताच संशयास जन्म देते.

महाराष्ट्रातील वाढलेल्या मतदारयाद्या आणि वेबकास्टिंग अजूनही सादर झालेले नाही; उलटपक्षी ४५ दिवसांत कागदपत्रे नष्ट करण्याची दुरुस्ती कायद्यात करण्यात येते, यामुळे संशयाला पुष्टी मिळते. हा संशय दूर झाला पाहिजे. बिहार प्रकरणी न्यायालयात योग्य तो निर्णय होईल आणि निवडणुकीतही मतदार आपला कौल देतील; पण या निमित्ताने निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेची आणि विश्वासार्हतेची पुन्हा एकदा परीक्षा आहे, हे निश्चित.

## प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन




**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** रवीनगर, नागपूर सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर येथे आषाढी एकादशी निमित्ताने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या निमित्ताने शाळेच्या परिसरात पारंपरिक वेशभूषेत दिंडी मिरवणूक काढण्यात आली.

विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंगाच्या गजरात "विठोबा राया पंढरीचा" जयघोष करत संपूर्ण वातावरण भक्तिमय करून टाकले. विद्यार्थ्यांनी संतांची रूपं साकारत वारकरी परंपरेचे सुंदर दर्शन घडवले. यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग सादरीकरण करून उपस्थितांचे मन जिंकले.

संत तुकाराम, संत नामदेव यांचे अभंग भक्तिरसात ओतप्रोत होते. कार्यक्रमाचे आयोजन अतिशय शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी पद्धतीने पार पडले.

आषाढी एकादशीच्या कार्यक्रमा निमित्य सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय महान च्या निवृत्त प्राचार्या विजया दहीकर प्रमुख पाहुण्या तसेच शाळेच्या प्राचार्या वंदना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, "वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची अभिमानास्पद परंपरा असून विद्यार्थ्यांनी तिचे जतन करण्यास सांगितले. शेवटी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विजया दिक्षित यांनी केले.

## "एक पेड मा के नाम" वन महोत्सव जि. प. शाळा तोंडली येथे साजरा



**किशोर साहु: मौदा, ता. ७ :** तालुक्यातील जि प प्राथमिक शाळा तोंडली येथे एक पेड मा के नाम वन महोत्सव उपक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण नागपूरचे विभागीय वनाधिकारी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम दि. 2 जुलै रोजी पार पडला. झाडे आपल्यासाठी तसेच संपूर्ण सजीव सृष्टीसाठी खूप महत्त्वाचे आहेत त्यासाठी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन सारखी चांगली सवय मुलांमध्ये लागण्यासाठी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावले.

वृक्षारोपणासाठी सामाजिक वनीकरण रामटेक येथून रोपे मिळाली. वृक्षारोपणासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी जितेंद्र ढाले , वनपाल एन एन केंद्रे , आर आर शुक्ला, वनरक्षक स्वरूप सेंगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

तोंडली गावचे सरपंच दर्शना बागडे, उपसरपंच रामपाल धांडे, शाळा व्य. समिती अध्यक्ष प्रभाकर तिजारे, माजी उपसरपंच सुरेंद्र बाभरे, जि.प.शाळा तोंडली मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे, सहशिक्षक निलेश जाधव, गावकरी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाडाचे रोपटे देऊन त्याच्या घराच्या परिसरात तसेच शेताच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली.वृक्ष लावताना विद्यार्थ्यांच्या आईसोबत फोटो काढण्यात आला. इको क्लब उपक्रमांतर्गत वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## सेवासदन हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय तर्फे वारी संपन्न



**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** सेवासदन हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून शालेय परिसरात विठ्ठल वारीचे आयोजन केले.

विठ्ठल वारीच्या निमित्ताने सेवासदन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रामुख्याने यामध्ये मंगलवेष तथा नऊवारी परिधान करून विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची भूमिका साकारली..

वारीच्या माध्यमातून हजारो लाखो लोक एकत्र येऊन उत्साहाच्या वातावरणात ज्याप्रमाणे एकता, समानता, निर्मळता अशा अनेक मूल्यांचे प्रदर्शन करतात ते विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी घोष, टाळ मृदंग, भगवे ध्वज, पर्यावरण संवर्धनाची फलके इत्यादीच्या माध्यमातून वारीचे दृश्य साकारले... संपूर्ण परिसर.. ज्ञानेश्वर माऊली तुकाराम........ पंढरीनाथ महाराज की जय....... अशा जयघोषाने दुमदुमले.. प्रसंगी विद्यार्थ्यांनी संवादातून वारीचे महत्त्व तसेच अभंग गायन केले. शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्साहाने वारीत सहभाग घेऊन सामुहिकता, एकता याचे उदाहरण प्रस्तुत केले.

## शिबिरातून 'समाधान' होते काय? फायदा तोट्याची तुलना करणे आज गरजेचे

- **शिबीराच्या दिवशी कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांचा ठणठणाट**
- **तालुका कार्यालयात आलेले नागरिक जातात आल्यापाऊली परत**
- **सरपंच व सामाजिक कार्यकर्त्यांनी मांडले आपापले मत**

**सचिन चौरसीया: रामटेक, ता. ७ :** तालुक्याच्या विशेषता ग्रामीण भागात आजपावेतो अनेक समाधान शिबिरे पार पडली, त्यात राशन कार्ड संबंधित लहान सहान कामे तथा कास्ट आधी बनविण्यासाठी टोकन देणे या लहान सहान कामाव्यतिरिक्त किती लोकांची मोठ मोठी कामे या एका दिवसाच्या शिबीरात पार पडली व त्यातील किती लोकांना शेवटी तालुक्याच्या ठिकाणी असलेले तहसील कार्यालय तथा इतर विविध विभागाचे शासकीय कार्यालयच गाठावी लागली याची तुलना करणे व कारणमीमांसा करणे आज गरजेचे झाले आहे. पूर्णपणे समाधान होतच नसेल तर हे समाधान शिबिर कोणत्या कामाचे हा प्रश्न प्रामुख्याने नागरिकांमध्ये उपस्थित केल्या जात आहे आहे.

उल्लेखनीय म्हणजे समाधान शिबिराच्या फायद्या तोट्याची तुलना करणे आज गरजेचे झाले आहे नाहीतर नागरीकांसह शासकीय यंत्रणेला उगाच मनस्ताप सहन करावा लागतो. नागरिकांच्या चर्चेवरून सविस्तर सांगायचे झाल्यास तालुक्याच्या ग्रामीण भागातील एखाद्या गावात जर समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले असेल तर तेथे तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या विविध शासकीय विभागाच्या कार्यालयातील पन्नासच्या जवळपास अधिकारी कर्मचाऱ्यांची शासकीय यंत्रणा त्या शिबिरामध्ये दिवसभर गुंतुन राहत असते. दरम्यान शिबिरामध्ये या दिवशी आसपासच्या गावातील काही लोक येतात तर काही येतही नाही तसेच आलेल्यांपैकी फक्त २०% लोकांची छोटी-मोठी कामे येथे होत असतात त्यात महसूल विभागाच्या पुरवठा विभागातील राशन कार्ड संबंधित काही कामे तर कास्ट बनविणे त्याची टोकन देणे तथा इतर विभाग कार्यालय संबंधित छोट्या मोठ्या कामांचा समावेश असतो बाकी इतर कामांसाठी त्यांना तालुक्याच्या ठिकाणी असलेले विविध विभागाचे कार्यालय गाठावेच लागते तेव्हा एवढ्या गोष्टीसाठी तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या विविध विभागाच्या कार्यालयातील जवळपास पन्नास च्या जवळपास अधिकारी कर्मचारी येथे रोपुन बसलेले असतात. याउलट याच दिवशी शहरासह तालुक्याच्या इतर भागातून तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या विविध विभागाच्या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना अधिकारी कर्मचारी कार्यालयात हजर नसल्याने व ज्या कामासाठी ते आले ते काम न झाल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. यात त्यांचा वेळ, त्या दिवशीची मजुरी, प्रवास भाडे आदी. व्यर्थ जात असते.

**सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची मते**

समाधान शिबिर चांगलेच आहे हो, यात लोकांची छोटी निपटून जातात, तालुक्याच्या ठिकाणी जाण्याचा त्यांचा वेळ, प्रवास भाडे, मजुरी यात वाचत असते. **-आशिष मासुरकर सरपंच ग्रा.पं. मांद्री**

**काय चुकीचं आहे ?**

शासनाने सुरू केलेली समाधान शिबिरे हे लोकांच्या फायद्याचीच आहे, लोकांची कामे यात होत असतात. - **सरपंच विजय भुरे ग्रा.पं. शिवनी (भोंडकी)**

♦काही अर्थ नाही या समाधान शिबिरांमध्ये, लहान सहान कामे वगळता इतर कामांसाठी लोकांनी शेवटी तालुक्याचे ठिकाणच गाठावे लागते. यामुळेच की काय तर शिबिरात लोकांची तेवढी उपस्थिती सुद्धा राहत नाही.
**- नितीन गेडाम सामाजिक कार्यकर्ता, आमगाव**

♦शिबिरातील पन्नास, शंभर लोकांसाठी तालुक्याच्या इतर भागातून तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या विविध शासकीय विभागाच्या कार्यालयात विविध महत्त्वाच्या कामांसाठी आलेले शेकडो नागरिक शासकीय यंत्रणेवर दोष देत आल्या पावली परत जात असतात तेव्हा अशा समाधान शिबिराचा काय फायदा. **- सरपंच मनोज लिल्हारे, ग्रा.पं. आजनी**

♦समाधान शिबिरे फायद्याचीच आहे मात्र विशेषतः आदिवासीबहुल भागात मजुर वर्ग जास्त असल्याने व ते सकाळी आठ वाजता पासूनच कामावर निघून जात असल्याने त्यांना शिबिराचा लाभ घेता येत नाही. त्यासाठी शासनाने उपाय योजना करावी.
**- संजय नेवारे माजी सभापती पं.स. रामटेक**

## कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे तत्काळ बंद करा रिपा.भीमशक्ती संघटनाची मागणी



**कन्हान, प्रतिनिधी ता. ७ :** कन्हान पोलीस स्टेशन हद्दीत वाढलेले अवैध धंद्यांवर कारवाई करुन त्वरीत बंद करण्याच्या मागणीचे निवेदन रिपब्लिकन भीम शक्तीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर भिमटे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने कन्हान पोलिस निरीक्षक वैजयंती मांडवधरे यांना दिले.

यावेळी पोलिस निरीक्षक वैजयंती मांडवधरे यांनी निवेदन स्वीकारून अवैध धंद्यावर अंकुश लावून कारवाई करण्याचे आश्वस्त केले.

पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंदे मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. कन्हान परिसरात वाळू, कोळसा, जनावरे वाहतुक, सट्टा,जुगार, सुंगधित तंबाकु, गांजा,देह व्यवसाय, अवैध दारु विक्री, एमडी अर्मलपदार्थ सारखे अवैध धंदे जोमाने शुरु आहेत. नशा करणाऱ्यावर व अवैध धंदे करणाऱ्यावर अपराधीत वृत्तीवर पोलीसांचा धाक नसल्यामुळे, अपराधिक वृत्तीचे मनोबल वाढत आहेत. किंबहुना मनोबल फोफावत आहे. कन्हान पोलीस स्टेशन कार्यालयात अपराधिक वृत्तीचे वावर सतत मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ज्यामुळे पोलीसांचा धाक अपराधिक वृत्तीच्या लोकांमध्ये कमी होत आहे. व सामान्य नागरिकात यामुळे पोलीसांची प्रतिमा मलीम होत आहे, तसेच यामागे कर्मचाऱ्यांचे आर्थिक व्यवहार असल्याची शक्यता नाकारता येत नाही, यामध्ये डीबी पथका सह कर्मचाऱ्यांचे मोबाइल सीडीआर काढला तर अपराधिक व्यकितना संरक्षण देण्याचे पुरावे समोर येतील. अश्या कृत्यामुळे महाराष्ट्र पोलिसांची प्रतिमा धुमिल होत आहे. अश्या अपराधी वृत्तीच्या लोकांनावर आळा घालण्याचे अत्यंत गरजेचे आहेत. कन्हान पोलिस स्टेशन अंतर्गत संपूर्ण अवैध धंद्यावर कारवाई करून. अपराधी वृत्तीच्या लोकांन वर मोका, मोकोका, एम.पि. डी.आय, तसेच विविध धारा लावून तत्काल कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदना द्वारे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार नागपूर ग्रामीण, तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक दिलीप पाटील भुजबळ यांना प्रेषित केली. मोठ्या प्रमाणात रेती चोरी व सट्टा जुगार : कन्हान शहरा सह ग्रामीण भागात सत्रापुर सिहोरा, निलज खंडाळा, नरसाळा, पिपरी गाडेघाट, जूनिकामठी, घाटरोहणा, नांदगांव, एसंबा सह ग्रामीण भागात जोमात सुरू आहे. याकडे विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे पथक प्रमुख डीवायएसपी अनिल मस्के यांनी विशेष लक्ष केंद्रित करून कारवाई करण्याची अत्यंत गरज आहे. यावेळी प्रामुख्याने मनोज गोंडाने, नितीन मेश्राम, रवींद्र दुपारे, राजेश फुलझेले, रॉबिन निकोसे सह रिपब्लिकन भीमशक्तीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ग्राम पंचायत कार्यालय विरसी येथे अतिक्रमणधारकांना पट्टेवाटप कार्यक्रम



**किशोर साहु: मौदा, ता. ७ :** तालुक्यातील खात - रेवराल जि प क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ग्राम पंचायत कार्यालय विरसी येथे शनिवार (दि 5 जुलै) ला राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली गावातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख नितेश वांगे, तालुकाध्यक्ष प्रशांत भुरे, भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल,

चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण, माजी सभापती स्वप्नील श्रावणकर, मनोज कोठे, माजी जि प सदस्या राधा मुकेश अग्रवाल, सरपंच लक्ष्मी चौधरी, उपसरपंच पंकज वाणी, ग्रामपंचायत सदस्यगण दिनेश मते, श्रीनिवास कोरा, चंद्रकला रमेश चौरे, माला किसना सोनवाने ,अनिता किसना पारेकर, कु. सारिका भलावी ,तंटामुक्त अध्यक्ष श्रावण सहारे, सचिव सरबत मोहारे, ग्राम रोजगार सेवक, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यकर्ता, ग्रामपंचायत कर्मचारी वृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

मुद्रक, प्रकाशक व संपादक दिनेश खेमसिंग दमाहे यांच्या वतीने मिडिया प्रिन्ट ७९७, मिश्रा किराणा स्टोर्स जवळ, नविन बाबुळखेडा, पार्वती नगर, नागपूर ४४००२७ येथे मुद्रित करुन सांध्य दैनिक प्लॉट क्र. १५९, महाजन ले आऊट, महाजन लॉन जवळ सावनेर तह. सावनेर जि. नागपूर - ४४११०७ (महाराष्ट्र राज्य) येथून प्रकाशित. (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदार) मो. 9370868686, Email-insidernewstoday@gmail.com

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची महापूजा संपन्न

## बा विठ्ठला... बळीराजाला सुखी व समाधानी ठेव, राज्यावरील संकटे दूर कर, सर्वांनाच सन्मार्गाने जगण्याची सुबुद्धी दे-मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

**पंढरपूर, प्रतिनिधी ता. ७ :** पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी

कैलास दामु उगले, कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री महोदय यांचा सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.





मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा फडणवीस यांनी व्यक्त केली.निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रारंभी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्तावित केले. यामध्ये यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये शासन व जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी वर्ग समाधानी असून वारकऱ्यांची संख्या वाढली आहे व त्यावर योग्य नियंत्रण ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार वितरण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांक - श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक १३, जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा. द्वितीय क्रमांक - श्री बाळकृष्णबुवा वारकरी दिंडी क्रमांक १९, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा. तृतीय क्रमांक - श्री गुरु बाळासाहेब आजरेकर दिंडी क्रमांक २३, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा.

# गडचिरोली पोलीस दलातील शहीद जवानांच्या कुटुंबियांसाठी शिबिराचे आयोजन

- 'शहीद सैनिक आश्रित कुटुंब आरोग्य कल्याण योजनेच्या' नोंदणी शिबिर व वैद्यकीय तपासणी
- गडचिरोली पोलीस दल व सहयोग हॉस्पिटल, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले शिबिर
- एकूण 70 शहीद जवानांच्या कटुंबातील सदस्यांची करण्यात आली नोंदणी
- एकूण 72 कुटुंबियांची करण्यात आली मोफत वैद्यकीय तपासणी

**गडचिरोली, प्रतिनिधी ता. ७ :** जिल्हा हा माओवाददृष्टा अति-संवेदनशिल असून, जिल्ह्यामध्ये माओवाद्यांच्या हिंसक कारवायांमध्ये सुरक्षा दलाचे आजपावेतो एकूण 213 जवान शहीद झालेले आहेत. सर्व शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या कल्याणाकरिता गडचिरोली पोलीस दलाकडून विविध उपक्रम राबविले जात असतात. याचाच एक भाग म्हणून वीर मरण आलेल्या शहीद जवानांच्या कुटुंबाबद्दल कृतज्ञता तसेच आदर व्यक्त करण्याच्या दृष्टीकोनातून शहीद जवानांच्या कुटुंबातील सदस्यांकरिता गडचिरोली पोलीस दल, पोलीस रुग्णालय, गडचिरोली व सहयोग हॉस्पिटल, गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 05 जूलै 2025 रोजी 'शहीद सैनिक आश्रित कुटुंब आरोग्य कल्याण योजनेच्या' नोंदणी शिबिराचे आयोजन पोलीस मुख्यालय परिसरातील एकलव्य हॉल येथे करण्यात आले.



पोलीस अधीक्षक, गडचिरोली नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सदर योजना गडचिरोली जिल्ह्यात राबविली जात असून, सहयोग हॉस्पिटल, गोंदियाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक जयेशचंद्र रमण रमादे संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या शहीद सैनिक आश्रित कुटुंब आरोग्य कल्याण योजनेच्या माध्यमातून गडचिरोली पोलीस दलातील शहीद जवानांच्या कुटुंबातील आई-वडील, पत्नी व 18 वर्ष वयाखालील पाल्य यांच्याकरिता आपत्कालीन सुविधा, ओपीडी, आयपीडी, शस्त्रक्रिया तसेच रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकिय सुविधांचा लाभ पूर्णपणे मोफत पुरविला जाणार आहेत. सदर नोंदणी शिबिरामध्ये 70 शहीद जवानांचे कुटुंबिय उपस्थित होते. उपस्थित सर्व शहीद जवानांच्या कुटुंबातील सदस्यांची नोंदणी करण्यात आलेली असून, त्यांना सदर योजनेचे नोंदणी प्रमाणपत्र पोलीस अधीक्षक, गडचिरोली नीलोत्पल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून शहीद जवानांच्या कुटुंबियांना विविध अत्यावश्यक तसेच अत्याधूनिक वैद्यकिय सुविधांचा लाभ मिळणार आहे. रुग्णालयातील कार्डीओलॉजी, न्युरोलॉजी, पॅथॉलॉजी, रेडीओलॉजी यासारख्या विविध अत्याधूनिक विभागांद्वारे शहीद जवानांच्या कुटुंबातील अबालवृद्धांना प्राथमिक वैद्यकिय चाचणीपासून ते अत्याधूनिक शस्त्रक्रियेपर्यंतच्या सर्व सुविधा पुरविल्या जाणार असल्याने त्यांचे जीवनमान सुसह्य होण्यास मदत होणार आहे. तसेच शिबिरादरम्यान उपस्थित सर्व शहीद जवानांच्या कुटुंबातील एकूण 72 सदस्यांची पोलीस रुग्णालय, गडचिरोली व सहयोग हॉस्पिटल, गोंदिया यांच्या वतीने मोफत वैद्यकीय तपासणी देखील करण्यात आली. सदर कार्यक्रमप्रसंगी पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले की, "गडचिरोली पोलीस दलाकडून शहीद जवानांच्या कुटुंबियांसाठी यापुढेही अशा प्रकारचे विविध उपक्रम राबविण्यात येऊन भविष्यात इतर काही रुग्णालयांसोबत देखील शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यासाठी गडचिरोली पोलीस दल प्रयत्नशिल आहे."

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) सत्य साई कार्तिक, तसेच पोलीस उप-अधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस रुग्णालय, गडचिरोलीचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनिल मडावी व त्यांची टीम, सहयोग हॉस्पिटल, गोंदियाचे सहाय्यक व्यवस्थापक (हेल्थ अँड वेलनेस) डॉ. विश्वेश्वर विरुळकर व त्यांची संपूर्ण टीम जनसंपर्क शाखेचे अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस कल्याण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली

# वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी 'वृत्तपत्र विक्रेता भवन' उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ : आ. बाळासाहेब मांगुळकर



**यवतमाळ, प्रतिनिधी ता. ७ :** ६ जुलैला दु. १ वाजता यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेद्वारा वृत्तपत्र विक्रेता सदस्यांची पाल्य व वृत्तपत्र वितरण करून १० वी १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आ. बाळासाहेब मांगुळकर यांचा प्रथम वृत्तपत्र विक्रेता संघातर्फे सत्कार करण्यात आले. त्यानंतर १० वी १२ वी विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर व त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दहावी बारावी विद्यार्थ्यांनी भरपूर मेहनत करावी आणि प्रचंड यश संपादन करावे अशा शुभेच्छा दिल्या. तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी संस्थेने जागेची पाहणी करून वृत्तपत्र विक्रेता भवन बांधावे याकरिता आपण आमदारनिधीमधून निधी उपलब्ध करून देऊ असे सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शहर काँग्रेस पक्ष अध्यक्ष प्रा. बबलू देशमुख, कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक शिंदे, उपाध्यक्ष राजू हनवते, म.रा. उपाध्यक्ष संतोष शिरभाते मंचावर उपस्थित होते. यावेळी १० वीचे ११ विद्यार्थी तर १२ वीचे १५ विद्यार्थ्यांना समाजसेवक अमन भाई यांच्याकडून प्रत्येक विद्यार्थ्यांना ६ नग रजिस्टर देण्यात आले. तर शार्दुल ठाकूरकडून पेन पेन्सिल देण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत स्कूल बॅग देण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी किरण कोरडे, श्रीराम खत्री, राजु भलावी, मदन केळापुरे, सचिन कदम, प्रवीण आगलावे, किशोर भेदरकर, सुनील बोरकर, तुषार गुजलवार, परीश्रम घेतले. आभार किशोर भेदरकर यांनी मानले. यावेळी कमलनयन कोठारी, श्रीपाद तोटे, राजु काळे, संजय गुजलवार मोठ्या प्रमाणात सदस्यांची उपस्थिती होती.

# शासकीय पुरस्कारप्राप्त स्वच्छतागृहाची दयनीय अवस्था

- बोरी बसस्थानक परिसरात महिलांची व विद्यार्थिनींची गंभीर गैरसोय

**संजय कारवटकर : यवतमाळ, ता. ७ :** 'स्वच्छ भारत अभियान'अंतर्गत केंद्र सरकारकडून शासकीय पुरस्कार प्राप्त झालेले बोरी गाव सध्या स्वच्छतेच्या विरोधातले जिवंत उदाहरण ठरत आहे. कारण गावातील बोरी बसस्थानक परिसरात असलेले एकमेव शासकीय स्वच्छतागृह सध्या अतिशय दयनीय स्थितीत असून, हेच स्वच्छतागृह पूर्वी पुरस्कारासाठी निवडले गेले होते.



या स्वच्छतागृहाची साफसफाई, देखभाल व दुरुस्ती पूर्णपणे थांबलेली आहे. इमारत उध्वस्त अवस्थेत असून, परिसरात साचलेली घाण, दुर्गंधी आणि गैरसोयींमुळे या ठिकाणी येणाऱ्या महिलांना व विद्यार्थिनींना उघड्यावर जाण्याची वेळ येत आहे. ही स्थिती अत्यंत लाजिरवाणी व आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे. यासंदर्भात नागरिकांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्या असूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. बसस्थानक परिसरात दररोज शेकडो प्रवासी, महिला व विद्यार्थी ये-जा करतात. परंतु मूलभूत सुविधा नसल्यानं शासकीय यंत्रणेच्या दिरंगाईचे हे ठळक उदाहरण मानले जात आहे. बोरी ग्रामपंचायतीने त्वरित लक्ष घालून या स्वच्छतागृहाची मरम्मत, स्वच्छता आणि पुर्नउपयोग सुनिश्चित करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा, ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

# आपटी येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम कासव गतीने

**संजय कारवटकर : यवतमाळ, ता. ७ :** राळेगाव तालुक्यातील आपटी (रामपूर ) येथे गावामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या टाकीचे काम कमीत कमी 1 वर्षपासून रखडले असून त्यांचं काम खूप कासव गतीने चालू आहे,पाण्याच्या टाकीचीप्रथम परवडेल असा काम रोड फोडून पाईप लाइन टाकल्याने गावात नागरिकांनाच्या घरासमोरील खड्डे पडल्यामुळे छोटा मोटा अपघात घडू शकते तर याला जबाबदार

## > बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

कोण? प्रशासन की ठेकेदार असणार आहे असा प्रश्न गावाकऱ्यामध्ये पडला आहे. ठेकेदाराला गावाकऱ्यांनी पाण्याच्या टाकीच्या कामा बद्दल विचारणा केली असता त्यांनी सांगितले की बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध नाही असे सांगण्यात आले आहे. तर गावात पाईप लाइच्या खड्ड्यामुळे गावाकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तर प्रशासनाने लवकरात लवकर गावातल्या पाईप लाइनचे खड्डे बरोबर करून द्यावे आणि टाकीचे काम लवकर पूर्ण करावे अशी गावाकऱ्यांची प्रशासनाकडून अपेक्षा व्यक्त केली आहे.



# शिवाजी नगर जिमखाना, नागपूरच्या सिया देवधरची वरिष्ठ भारतीय महिला बास्केटबॉल संघात निवड

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** शिवाजी नगर जिमखाना, नागपूर येथील प्रतिभावान २२ वर्षीय बास्केटबॉलपटू सिया देवधर हिची वरिष्ठ भारतीय महिला बास्केटबॉल संघात निवड झाली आहे. ती १३ ते २० जुलै २०२५ दरम्यान शेन्झेन, चीन येथे होणाऱ्या प्रतिष्ठित FIBA आशिया कप स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

सिया ही नागपूर शहरातील एकमेव बास्केटबॉलपटू आहे जिने १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२३ मध्ये चीनमधील हांगझोऊ येथे भारताचे प्रतिनिधित्व केले. तिने 3x3 बास्केटबॉल प्रकारात सहभाग घेतला होता. सियाने केवळ ६ व्या वर्षी शिवाजी नगर जिमखाना येथे बास्केटबॉलचा सराव सुरू केला. शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रशिक्षक शत्रुघ्न गोखले आणि कोच विनय चिकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली तिचा कसून विकास झाला. ती धारमपेठ, नागपूर येथील रहिवासी असून, तिचे पालक श्रीश देवधर आणि स्वाती देवधर हे तिच्या यशाचा अभिमान बाळगणारे पालक आहेत.



सियाने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत अनेक राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. केवळ १६ व्या वर्षीच तिला वरिष्ठ महिला भारतीय शिबिरात सहभागी होण्याची संधी मिळाली होती. २०१९ मध्ये, सिया ही अमेरिकेत हायस्कूल बास्केटबॉल खेळणारी फक्त चौथी भारतीय महिला खेळाडू ठरली. तिच्या अगोदर असमत कौर तौन्क, हर्षिमरन कौर आणि ॲन मेरी झकारिया या खेळाडूंनी ही कामगिरी केली होती. सिया ही NBA Academy India Women's च्या सर्व तीन प्रशिक्षण शिबिरात सहभागी होणारी एकमेव भारतीय खेळाडू आहे (मे २०१८, जानेवारी २०१९, ऑक्टोबर २०१९). विशेष म्हणजे, तिला प्रत्येक शिबिरात पारितोषिक मिळाले.

# महाराष्ट्रधर्म थांबलाच नाही, साखळी कधी तुटली नाही...!- मुख्यमंत्री

- ज्ञानेश्वरांच्या ओव्यांपासून, शिवरायांच्या तलवारीपर्यंत, महात्मा फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'महाराष्ट्रधर्म' विशेष पॉडकास्टचा प्रारंभ

**मुंबई, प्रतिनिधी ता. ७ :** 'महाराष्ट्राचा इतिहास गौरवशाली आहे. आणि ती एक जबाबदारी देखील आहे. आपण ज्ञानेश्वरांचे, शिवरायांचे, क्रांतीज्योती सावित्रीबाईंचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थेट वशंज नसलो, तरीही विचारांच्या वारश्याचे वाहक आहोत. या सर्वांनी आपल्या ज्ञानाने, त्यागाने आणि धैर्याने हे राज्य घडविले. त्याला जपणे, वाढवणे आणि पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे स्मरण रंजन नाही.

तो आपला नैतिक मार्गदर्शक. आपण कोण आहोत, हे समजून घेऊन, आपल्याला काय घडवायचे आहे, ते ठरविणे, हाच महाराष्ट्रधर्म आहे,' अशी मांडणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'महाराष्ट्रधर्म' विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला.

ही मुलाखत सुप्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक – लेखक आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे वंशज डॉ. सदानंद मोरे यांनी घेतली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 2014 ते 19 या आपल्या पहिल्या कार्यकाळात 'मी मुख्यमंत्री बोलतोय' हा टि.व्ही. शो केला होता. आता नवमाध्यमात लोकप्रिय अशा पॉडकास्टच्या माध्यमातून ते जनसंवाद साधणार आहेत.

**पॉडकस्ट मालिकेचा प्रारंभ 'महाराष्ट्रधर्म :** पायाभरणी आणि उभारणी' या विषयापासून झाला. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आलेल्या 'महाराष्ट्रधर्म' या विशेष पॉडकास्ट मालिकेचे हे पहिले चरण होते. यात रामायणापासून ते महाभारतापर्यंत, जगाला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवणाऱ्या गौतम बुद्धांपासून ते भक्ती संप्रदायाच्या संतांपर्यंत आणि महाराष्ट्राची अध्यात्मिक पायाभरणी आणि उभारणी या विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समाज माध्यमावरून हे पॉडकास्ट करण्यात येत आहे.या पहिल्याच पॉडकास्टमध्ये सहभागी झालेल्या श्रोत्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले आहेत. तसेच यापुढेही महाराष्ट्राच्या इतिहासात, संस्कृतीमध्ये, साहित्यामध्ये देवभूमी, संतभूमी, वीरभूमी म्हणून विचार आहे. या सर्वांचा धांडोळा घेतानाच, महाराष्ट्र हा महाराष्ट्र का आहे, याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न राहणार असल्याचेही म्हटले आहे. आजच्या पहिल्याच पॉडकास्टमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राची पायाभरणी आणि उभारणीच्या अनुषंगाने मांडणी केली. 'महाराष्ट्रधर्म हा धर्म नाही. ती आहे, एक जीवंत मुल्य संहिता. ती सांगते विवेकाने विचार करा. सेवाभावाने वागा, आणि शौर्याने उभे राहा.

### महाराष्ट्राची कहाणी सुरु होते देवांच्या पावलांनी...

महाराष्ट्राची कहाणी सुरु होते, ते देवांच्या पावलांनी. रामायणात याचा उल्लेख आहे. राम वनवासात होते. त्यावेळी ज्या दंडकारण्याचा उल्लेख येतो. ते दंडकारण्य विदर्भ ते नाशिक-पंचवटी पर्यंत विस्तारले आहे. महाभारतात सुद्धा महाराष्ट्राची भूमी आहे. विदर्भात दमयंतीची गोष्ट घडली.कोकणातील गुहांमध्ये अर्जून धान्यस्थ बसले होते, असे लोककथांमध्ये सांगितले जाते. महाभारतातल्या रमणीय कथेचा भाग घडतो, तोही विदर्भातच. रुक्मिणीचे कौंडीण्यपूर आणि तिथून तिची भगवान श्रीकृष्णांनी केलेली सूटका, त्यासाठीचे युद्ध देखील या विदर्भाच्याच भूमित घडले. पांडव अज्ञातवासात राहीले, ते चिखलदऱ्यात. किचकाची जुलमी राजवट पांडवानी उधळून लावली. सत्याने असत्यावर मिळवलेल्या विजयाची ही रोमहर्षक कहाणी आहे. महाराष्ट्राची भूमी पुराणांमध्येही आहे. भगवान गौतम बुद्ध हे महाराष्ट्राच्या भूमीत शांततेचा संदेशाच्या रुपाने इथे पोहचले. त्यांचे शब्द संदेश लोकांनी शांतपणे आत्मसात केले. ते शब्द जपले. अजिंठ्याच्या शांत डोंगररांगामध्ये भिक्खुंनी त्यांच्या कथा दगडात कोरल्या. जगाला दुःखातून मुक्त होण्याचा ज्यांनी मार्ग दाखवला त्या भगवान गौतम बुद्धांचे शब्द महाराष्ट्राने फक्त ऐकले नाहीत. त्यांना गुफांमध्ये, स्मृतीमध्ये आणि आत्म्यातही जपले. महाराष्ट्रातील दैवी ऊर्जेमुळे इथे सत्याचा, विश्वाचा शोध घेणारे साधक, संत, विचारवंत इथे आले आणि रमले. शंकराचार्यांनी भारतभर भ्रमण केले. त्यांनी त्यांचे एक महत्वाचे पीठ करवीर पीठाच्या रुपाने स्थापन केले. इथे साक्षात महालक्ष्मीचा निवास आहे. महाराष्ट्र हा उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा दूवा आहे.

# जेष्ठ नागरीक समाजातील मुख्य घटक : मंत्री मुळक



**सचिन चौरसीया: रामटेक, ता. ७ :** भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे. जुलै महिन्यात जन्मदिवस व जेष्ठ नागरीक असणारे यांच्या सत्कार माजी मंत्री राजेंद्र मुळक यांचे हस्ते जेष्ट नागरीक विरंगुळा केंद्र, शहिद स्मारक रामटेक येथे ५ जुलै करण्यात आला. सत्कार करणाऱ्या मधे ८५ वर्षावरिल चंद्रभान बघेले, दत्तात्रय पंडे गोविंदराव मिरासे व जन्मदिवस असणारे संपतराव वंजारी, नरेंद्र काळे यांचा समावेश होता. या वेळी माजी राज्यमंत्री व कांग्रेस नेते राजेन्द्र मुळक म्हणाले की जेष्ठ नागरीक समाजातील मुख्य घटक आहे. त्यांच्यापासून जिवन जगण्याची कला शिकता येते. त्याच्यामध्ये प्रेमभावना संस्कार आहेत. जेष्ठ नागरीकांचे कार्यालय शहिद स्मारक येथे आहे ही समाधानाची बाब आहे. कारण जेष्ट नागरीकांनी स्वातंत्रपूर्व काळ अनुभवला आहे. त्यामुळे शहिद स्मारकासी जेष्ट नागरीकांच्या भावनां जुळल्या आहेत. राजेंद्र मुळक यांनी जेष्ट नागरीकांना विविध योजनाचा लाभ घेण्याकरीता कंम्पुटर व प्रींटर देण्याची घोषणा केली. ते म्हणाले की वधू- वर परीचयाचे सामाजिक काम जेष्ट नागरीकांनी करावे. यावेळी अध्यक्ष सुखराम उच्चीबगले, सचिव वामन नायगांवकर, उपाध्यक्ष हरीहर भुजाडे, सहसचिव रमाकांत कुंभलकर, तुलाराम मेंढे शहित मोठ्या संखेत उपस्थित होते.

# जलसंपदा प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी अधिकाऱ्यांनी कटिबद्ध होणे आवश्यक

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## जिल्ह्यात होणार तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांची कार्यालये

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषासह नागपूर जिल्ह्यातील सिंचनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण प्रकल्पांना शासनाने अनेक वर्षांपूर्वी मान्यता दिली. यात काही उपप्रकल्प, काही कालव्यांचा समावेश आहे. 15 वर्षांपूर्वी ज्या प्रकल्पांना मंजूरी दिली आहे त्या प्रकल्पांची कामे अजूनही पूर्णत्वास पोहोचली नाहीत अशी खंत महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली. ज्या-ज्या विभागाची प्रकल्प व कामे प्रलंबित आहेत त्या-त्या विभागप्रमुखांनी स्वत:हून आपले प्रकल्प, कामे कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी कटिबद्ध असले पाहिजे. मंत्रालयीन स्तरावर जर कामांबाबत तांत्रिक त्रुट्या असतील तर त्या दुरुस्तीसाठी कर्तव्यतत्पर अधिकारी नेमून खबरदारी घेण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

जिल्ह्यातील विविध विकास कामांबाबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे बैठक संपन्न झाली.



### ▪ मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या कार्यालय बांधकामांबाबत गावनिहाय प्रस्ताव सादर करा


सर्वसामान्य लोकांना, शेतकऱ्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी गावपातळीपर्यंत होण्यासाठी तलाठी, मंडळ अधिकारी यांची कार्यालये व उपलब्धता असणे अत्यंत आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यात एकूण तलाठ्यांची संख्या, मंडळ अधिकारी यांची संख्या लक्षात घेऊन गावकऱ्यांच्या सोईच्या दृष्टीने योग्य राहील अशी जागा निवडून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

आपल्या कार्यक्षेत्रातील विविध गावांना प्रत्यक्ष भेट देऊन कार्यालये व कामांची पाहणी अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. लोकांशी प्रत्यक्ष भेटून त्यांच्या ज्या काही अडचणी आहेत त्या गावपातळीवर मार्गी लावण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व तलाठी यांनी आठवड्यातील ठराविक दिवस दौरे, गृहभेटी तसेच पाहणी करण्याचे आदेश दिले. पट्टे वाटप, सातबारा तसेच नागरिकांची महसूल विषयक कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तालुकास्तरावर शेतकरी संवाद व ग्रामसभेच्या आयोजनातून गावकऱ्यांच्या प्राथमिक स्वरुपाच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.

नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत असलेल्या गावातील पाणंद रस्ते व नाल्यांच्या कामांची जबाबदारी त्यांचीच

नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत असलेल्या गावातील नाल्यांची दुरुस्ती, निगा, पाणंद रस्त्यांची कामे याची जबाबदारी स्विकारुन ती पूर्ण केली पाहिजे. याचे मालकीत्व इतर विभागाचे नसून ते आपले आहे, अशा जबाबदारीतून ही कामे वेळेत पूर्ण केली पाहिजे. याचबरोबर गावातील पाणंद रस्त्यांसह इतर प्रकारच्या रस्त्यांचा नकाशा प्रत्येक ग्रामपंचायतीत त्यांच्या हद्दीनुसार लावण्याच्या सूचना पालकमंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

या बैठकीस आमदार आशिष देशमुख, आमदार चरणसिंह ठाकूर, आमदार विकास ठाकरे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, गोसेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता जयंत गवळी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता रवी पराते, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता व प्रशासक सोनाली चोपडे, गोसेखुर्द प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता राजेश पाटील, गोसेखुर्द उपसा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय विश्वकर्मा, पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता अनिल फरफडे, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळाचे अधीक्षक अभियंता महादेव कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पेंच प्रकल्पाच्या 20 टक्के जागेवर अतिक्रमण आहे. याची जबाबदारी सिंचन विभागाने स्विकारुन येत्या 3 महिन्यात अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग व सिंचन विभागातील अधिकाऱ्यांचा एक कृतीगट तयार करुन याबाबत प्रगती अहवाल वेळोवेळी सादर करण्यास त्यांनी सांगितले. अशा घरांची संख्या किती आहे, जिल्ह्यातील विविध सिंचन प्रकल्पांमुळे किती शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली जातात याबाबत निश्चित प्रस्ताव व ऐच्छिक पूर्नवसन आराखडा सादर करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.




# युद्धाच्या गर्तेत जगाला अहिंसेचा मंत्र देण्याची गरज

**▪ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी; मिहीर भागवत यांच्या 'बियाँड बॉर्डर्स' पुस्तकाचे प्रकाशन**

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** काळाच्या ओघात देशा-देशांमधील आंतरराष्ट्रीय संबंधांचे आयाम बदलले. युद्धांमध्येही अद्ययावत विकसित तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला. परिस्थिती बघता युद्धांच्या गर्तेत जगाला अहिंसेचा मंत्र देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

मिहीर भागवत या १६ वर्षांच्या तरुणाने लिहिलेल्या 'बियाँड बॉर्डर्स' या इंग्रजी पुस्तकाचे गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ. सी. डी. मायी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. जागतिक विषयावर अभ्यास करून अतिशय उत्तम पुस्तक लिहिल्याबद्दल गडकरी यांनी मिहीरचे कौतुक केले. गडकरी म्हणाले, 'आज जगात संघर्षाचे वातावरण आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यात युद्ध सुरू आहे. रशिया आणि युक्रेनमधील वाद पूर्णपणे संपलेला नाही. यामध्ये मानवतावादी दृष्टीकोन बाळगणे अधिक महत्त्वाचे आहे. अहिंसा प्रस्थापित होणे गरजेचे आहे. मिहीरने लहान वयात अध्ययन करून त्याचे चिंतन या पुस्तकात मांडले आहे.

# शाकाहारी पायदळ रॅली रविवारी

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** पीएसएसएम यांच्या वतीने रविवारी ८ .३० वाजता शाकाहारी पायदळ रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजक अँड. संतोष लांजेवार यांनी केले आहे. शाकाहार विषयी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. हिंगणा टी पाइंट येथून सकाळी 8:30 वाजता. रॅलीला प्रारंभ होईल. अनसूया मंगलकार्यालय, त्रिमूर्तीनगर, नागोबा मंदिर, पडोळे चौक, प्रतापनगर चौक येथून जाऊन छत्रपती नगर चौकात रॅलीचा समारोप होईल.

# देशाच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे क्रांतिकारी योगदान

## सहकार मंत्रालयाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित परिसंवादातील सूर



वर्धापनदिन व आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त येथील नियोजन भवनात 'सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर सहकार क्षेत्रातील झालेले बदल' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सहकारी संस्थेचे विभागीय सहनिबंधक प्रवीण वानखेडे, विभागीय उपनिबंधक दिनेश चंदेल, जिल्हा उपनिबंधक अजय कडू व विभागातील विशेष लेखापरीक्षक यावेळी उपस्थित होते.

या परिसंवादात माजी आमदार तथा शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष अनिल सोले, नागपूर नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्ष संजय भेंडे, विवेकानंद नागरी सहकारी संस्थेचे विवेक जुगादे, नागपूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष तथा गिरनार को-ऑप सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र घाटे यांचा सहभाग होता.संजय भेंडे म्हणाले, सामान्यांना आर्थिक मदतीचा हात देणाऱ्या सहकारी संस्था मोलाची भूमिका बजावतात. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या निर्मितीपूर्वी सहकार विभाग कृषी मंत्रालयाशी संलग्न होता. या मंत्रालयाच्या निर्मितीनंतर या क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले आहेत. सुरुवातीच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या आंतरराज्यीय सहकारी संस्थांवर अंकुश लावण्याचे काम या मंत्रालयाने केले. ही बाब सामान्यांसाठी उपयोगी पडली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहकारी संस्थांच्या कार्यशैलीचे त्यांनी यावेळी उदाहरण दिले. विवेक जुगादे यांनी, सहकारातील ताकद व क्षमता टिकवून ठेवायची तर संस्थेत सुसूत्रता व संवाद असणे गरजेचे असल्याचे सांगितले. संस्थेत एकजूट असेल तरच येणाऱ्या अडचणींवर मात करता येते. अनेक संस्थांना भेट दिली असता तेथील सदस्यांना प्रशिक्षणाची गरज आहे असे जाणवले असून त्यासाठी सहकार विभागांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अनिल सोले यांनी सहकारी संस्थांसमोर येणाऱ्या आर्थिक समस्या विषद केल्या. या संस्थांकडून कर्जवाटपाची प्रक्रिया अधिक अचूक पार पाडण्यात यावी असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रवीण वानखेडे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, विकास संस्थांचे संगणकीकरण, प्रधानमंत्री जन औषधी केंद्र, प्रधानमंत्री कृषी समृद्धी केंद्र, नोंदणीकृत सहकारी संस्थांचे सभासदत्व, भारतीय बीज सहकारी संस्थेच्या कार्य प्रणालीबाबत, व्यवसाय प्रक्रियेचे सुलभीकरण तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक वंचित घटकाचा विकास करण्यासाठी सहकाराशी प्रत्येक गाव जोडून 'सहकार से समृद्धी' योजनेअंतर्गत या देशाचा विकास कसा साधता येईल यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र घाटे यांनी केले. सहकारी संस्था व पतसंस्थेचे पदाधिकारी व सदस्य यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्याला अटक

## ६ लाख ७६ हजार ५० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## केळवद पोलीसांनी बजावली कामगिरी

**केळवद , प्रतिनिधी ता. ७ :** दिनांक ०४/०७/२०२५ रोजी केळवद पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद समोर छिंदवाड़ा नागपुर हायवे येथे नाकाबंदी केली असता टाटा झेस्ट कार क्र एम. एच ०१ सी. आर. २५६० ही नागपुर कडे येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक आरोपी नामे आफताब अन्सार शेख, वय ३२ वर्ष, रा. वार्ड कं ४, डब्ल्यु सी एल कॉलनी, उमरेड, जि. नागपुर याचे ताब्यातुन १) इगल हुक्का शिशा तंबखु बॅन्ड ४०० ग्रॅम वजनाचे एकुण १९८ कंपनी पॅकबंद पाकीटे, कि. १,६८,३००/- रूपये, २) होला हुक्का शिशा तंबखु बॅन्ड १ किलोग्रॅम वजानाचे एकुण ७० कंपनी पॅकबंद पाकीटे, कि. ९२,७५०/- रूपये ३) टाटा झेस्ट कार क्र एम. एच ०१ सी.आर. २५६० किंमती ४,००,०००/- रूपये आणि ४) एक विवो कंपनीचा अॅड्रॉईड फोन किंमती १५,०००/- रूपये असा एकुण ६,७६,०५०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकुण १४९.२०० किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु साठा जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथेभारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३. २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.

# भाजपा आध्यात्मिक आघाडीद्वारे आषाढवारी दिंडी सोहळा उत्साहात संपन्न!!



**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरीच्या पांडुरंगाचा आषाढी एकादशी निमित्ताने आषाढ वारी दिंडी सोहळा भाजपा आध्यात्मिक आघाडी नागपूर महानगर द्वारे गणेशपेठ येथील येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातून भजनी मंडळ आणि वारकरी भाविकांच्या उपस्थितीत उत्साहत संपन्न झाला. दिंडीचे पूजन आमदार प्रवीण दटके यांचे हस्ते करण्यात आले. भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या नेतृत्वात आषाढी एकादशी निमित्त विठ्ठलभक्त वारकरी आणि भजनी मंडळासोबत नामस्मरण दिंडी काढण्यात आली. यात पांडुरंग हरी जय जय पांडुरंग हरी, राम कृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी ,ज्ञानबा माऊली तुकाराम , पंढरीनाथ महाराज की जय आदींचा जयघोषाने परिसर विठ्ठल नामात दुमदुमला. वारीच्या माध्यमातून भाविकवृंद एकत्र येऊन उत्साहाच्या वातावरणात ज्याप्रमाणे एकता, समानता, निर्मळता अशा अनेक मूल्यांचे प्रदर्शन करतात याचा प्रत्यय आला. रस्ता विठ्ठल भक्तांनी सडे शिपडून, फुलांनी, रांगोळ्यांनी सुशोभित होता. दिंडीत घोष, टाळ मृदंग, भगवे ध्वज, पर्यावरण संवर्धनाची फलके इत्यादीच्या माध्यमातून वारीचे दृश्य साकारले. पालखीचे षोडशोपचार पूजन पौरोहित्याखाली आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष डॉ श्रीरंग वराडपांडे यांनी केले. पूजेचा मान विश्वनाथ कुंभलकर या दामपत्याना देण्यात आला. त्यानंतर हरीपाठ पठण करण्यात आला. विठ्ठल रखुमाई यांच्या फोटोचे मंत्र उपचाराने पूजन माल्यार्पण व महाआरती करून प्रसाद वितरण करण्यात आले. भक्त उपस्थित दिंडीत सहभागी होते. कार्यक्रमाचा समारोप पसायदानांनी झाला .या दिंडींच्या यशस्वितेसाठी आघाडी द्वारे अभिजीत कथले,मयूर वाजगे, विलास सपकाळ, स्वप्नील गायकवाड, माया हाडे, राहुल कुंभलकर, शंकर शर्मा, सुजात कठोते, दर्शना नखाते, विजय येरणे, समृद्धी वराडपांडे, आदिनी सहकार्य केले.

# नागपुरात अर्शदच्या शोधात ४० गँगस्टर सरसावले

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** मध्य नागपुरातील इप्पा गँगमध्ये मोठा वाद रंगला झाला. एका गँगस्टरच्या 29 वर्षीय पत्नीचे अर्शद टोपी नावाच्या गँग मेंबरसोबत अनैतिक प्रेमसंबंध होते. मात्र एका अपघातात गंभीर जखमी झाल्याने शुक्रवारी तिचा मृत्यू झाला. आता इप्पा गँगचे 40 सदस्य अर्शद टोपीचा जीव घेण्यासाठी त्याच्या मागावर आहेत. टोपीने विश्वासघात केल्याचा आणि खून केल्याचा त्यांचा संशय आहे.

अर्शद टोपी आणि संबंधित महिला कोराडी माता मंदिराच्या मागील सुरादेवी मंदिराजवळ बाईकने जात होते. त्यावेळी एका जेसीबी मशिनने त्यांच्या बाईकला धडक दिली. अपघातात महिला गंभीर जखमी झाली होती, तर टोपीला किरकोळ दुखापत झाली. कोराडी थर्मल पॉवर प्लांटच्या पेट्रोलिंग टीमने जखमी अवस्थेत महिलेला जवळच्या एका खाजगी रुग्णालयात नेले. पण, तिथे तिला दाखल केले गेले नाही. कामटीमधील दुसऱ्या रुग्णालयानेही तिला उपचार देण्यास नकार दिला. शेवटी, टोपीने एका अॅम्ब्युलन्स चालकाला पैसे देऊन तिला नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात (GMCH) नेले. तिथे शुक्रवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सीसीटीव्ही फुटेजमध्ये अर्शद टोपी हा जखमी महिलेसोबत एका खाजगी रुग्णालयात दिसला. तिच्या मृत्यूनंतर इप्पा गँगमध्ये तणाव वाढला. महिलेशी संबंध तोडण्याचे आदेश टोपीने न पाळल्याचा आरोप केला आहे. टोपीनेच महिलेला मारल्याचाही संशय त्यांना आहे. गँगचे सदस्य टोपीचा बदला घेण्यासाठी त्याला शोधत आहेत.

# रोडमार्क फाउंडेशन आणि स्वरमेघ आर्ट फाऊंडेशन यांचे संयुक्त अभियान

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** रोड मार्क फाऊंडेशन आणि स्वरमेघ आर्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोड सुरक्षा अभियाना अंतर्गत अनेक उपक्रमाची रूपरेषा विविध संघटना, सभासद यांच्या सहकार्याने आणि सहभागाने घेण्याची चर्चा करण्यात आली.



मानवी चुकांमुळे रस्त्या वरील होणारे अपघात जनजागृतीने कमी करण्याचा प्रयत्न सगळे मिळून करायचे आहे. नियमांचे पालन काटेकोर पणे करण्यात यावे या करिता हे अभियान राबविण्यात येत आहे. या करिता महाराष्ट्र शासनाचा देखील पाठिंबा लाभलेला आहे. या अभियानाच्या नियोजना करिता रोड मार्क फाऊंडेशनचे अध्यक्ष राजू उर्फ राजेश वाघ, स्वरमेघ आर्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष मनीष उपाध्ये, सेक्रेटरी प्रबोध देशपांडे, दिनेश टेकाडे, वानखेडे आदी मान्यवर उपस्थितीत होते.

# प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त उपक्रमांचे आयोजन

**नागपूर, प्रतिनिधी ता. ७ :** रवीनगर, नागपूर सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर येथे आषाढी एकादशी निमित्ताने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले.




या निमित्ताने शाळेच्या परिसरात पारंपरिक वेशभूषेत दिंडी मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंगाच्या गजरात "विठोबा राया पंढरीचा" जयघोष करत संपूर्ण वातावरण भक्तिमय करून टाकले. विद्यार्थ्यांनी संतांची रूपं साकारत वारकरी परंपरेचे सुंदर दर्शन घडवले. यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग सादरीकरण करून उपस्थितांचे मन जिंकले. संत तुकाराम, संत नामदेव यांचे अभंग भक्तिरसात ओतप्रोत होते. कार्यक्रमाचे आयोजन अतिशय शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी पद्धतीने पार पडले. आषाढी एकादशीच्या कार्यक्रमा निमित्य सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय महान च्या निवृत्त प्राचार्या विजया दहीकर प्रमुख पाहुण्या तसेच शाळेच्या प्राचार्या वंदना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, "वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची अभिमानास्पद परंपरा असून विद्यार्थ्यांनी तिचे जतन करण्यास सांगितले. शेवटी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विजया दिक्षित यांनी केले.

शेती जमीन विक्रीसाठी उपलब्ध

▪ रामटेक – भंडारा रोड, वाकेश्वर फाटा जवळ, खात रोड

४.५ एकर रोडटच शेती जमीन
हायवेपासून ८०० मीटर अंतरावर
डांबरी रस्त्यालगत, नदीजवळ
गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम संधी

▪ काटोल – सावरगाव रोड

३.५ एकर सुपीक शेती जमीन
हायवेपासून फक्त १०० मीटर अंतरावर
डांबरी रस्त्यालगत मुख्य रस्त्यालगतची, वाहनसुलभ जागा
शेती व गुंतवणुकीसाठी अत्यंत उपयुक्त

संपर्क: 9860093576, 9730116555